04/02/2023

# 2022

Combined group-C mains – Paper-1

संच क्र. **C**

## प्रश्नपुस्तिका – I

**A17**

## मराठी व इंग्रजी

प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. 103635

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | N | S | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑ ... शेवटचा अंक ↑

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील".**

SEAL

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

1. विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अवघड | (अ) | विरळ |
| (b) | विजोड | (ब) | पाया |
| (c) | कळस | (क) | अनुरूप |
| (d) | गच्च | (ड) | सोपे |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (अ) | (ब) | (क) | (ड) |
| (2) | (ड) | (क) | (ब) | (अ) |
| (3) | (ब) | (क) | (अ) | (ड) |
| (4) | (ड) | (ब) | (क) | (अ) |

2. हा आंबा साखरेपेक्षा गोड आहे. (अलंकार ओळखा)

(1) अनन्वय (2) दृष्टांत (3) भ्रांतिमान (4) व्यतिरेक

3. शब्द जातींचे प्रमुख प्रकार किती ?

(1) दोन (2) चार (3) सहा (4) आठ

4. भाववाचक नामांचा शब्द गट ओळखा.

(a) देवपण, प्रामाणिकपणा, मोठेपण

(b) गरिबी, गोडी, लबाडी

(c) प्रौढत्व, मित्रत्व, शत्रुत्व

(d) गांभीर्य, धैर्य, माधुर्य

(1) फक्त (a) व (c) बरोबर

(2) फक्त (b) व (d) बरोबर

(3) फक्त (b), (c) व (d) बरोबर

(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

5. विशेष्याची माहिती देणारा व विशेषणाचे गुण सांगणारा विकारी शब्द

(1) विशेषनाम (2) सामान्यनाम (3) विशेषण (4) धातू

6. ‘ससेमिरा लावणे’ याचा अर्थ

(a) प्रचंड आवाज करणे.

(b) धीर मिळणे.

(c) एकसारखा तगादा लावणे.

(d) तमाशा लावणे.

(1) फक्त (a) आणी (d) बरोबर

(2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर

(4) फक्त (a) बरोबर

7. ‘अनेक पदार्थ इतस्तत: अव्यवस्थितपणे पसरणे’ या अर्थाची म्हण ओळखा.

(1) बाजार करणे
(2) बाजाराला जाणे
(3) बाजार भरविणे
(4) बाजार मांडणे

8. ‘बावळी मुद्रा देवळी निद्रा’ याचा अर्थ कोणता ?

(1) बावळी मुद्रा घेवून देवळात निजणारा

(2) दिसण्यात बावळा, व्यवहारात चतुर

(3) निरपराध माणसाला शिक्षा देणे

(4) शहाणपणाचे सोंग आणणारा मुर्ख

9. ‘गाव जळाला, मारूती गावानिराळा’ या म्हणीचा अर्थ कोणता ?

(1) दुसऱ्याचे नुकसान करून नामनिराळा राहणे

(2) गावावर संकट आले, तरी देव धावला नाही

(3) दुसऱ्यांवर कुरघोडी करणारेच सुखी असतात

(4) दृष्ट कृत्य करणारे सहीसलामत सुटतात

10. प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली वाक्ये अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र नसतात, म्हणजेच ती एकमेकांवर अवलंबून असतात.

(1) विधानाचा पूर्वार्ध बरोबर
(2) विधानाचा उत्तरार्ध बरोबर
(3) संपूर्ण विधान बरोबर
(4) संपूर्ण विधान चूक

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**11.** 'तो भरभर – बोलतो', यातील 'भरभर' हा शब्द अव्ययाचा कोणता प्रकार दर्शवितो ?

(1) क्रियाविशेषण अव्यय (2) शब्दयोगी अव्यय

(3) केवल प्रयोगी अव्यय (4) उभयान्वयी अव्यय

**12.** 'किंवा', 'अथवा', 'की', 'अगर' – हे शब्द उभयान्वयी अव्ययातील कोणत्या प्रकारातील आहेत ?

(1) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय (2) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

(3) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय (4) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

**13.** केवलप्रयोगी अव्ययांच्या योग्य जोड्यांचे गट ओळखा.

(a) शोकद्योतक – हाय रे, अयाई, आई गं.

(b) स्वीकारद्योतक – ठीक, बरे, होय.

(c) संबोधनद्योतक – अरे, अगो, हो.

(d) आश्चर्यद्योतक – अहाहा, अरे बापरे, ओहो.

(1) फक्त (b) व (d) बरोबर (2) फक्त (a) व (c) बरोबर

(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर आहेत

**14.** 'च, देखील, ना, पण, मात्र, सुद्धा, ही' – कोणती शब्दयोगी अव्यये आहेत ? योग्य पर्याय लिहा.

(1) हेतूवाचक (2) कैवल्यवाचक

(3) विरोधवाचक (4) शुद्धशब्दयोगी

**15.** 'कागदपत्र', 'कामकाज', 'बाजारहाट' या अभ्यस्त शब्दांचा प्रकार कोणता ?

(1) पूर्णाभ्यस्त (2) अंशाभ्यस्त

(3) अनुकरणवाचक (4) हे अभ्यस्त शब्द नाहीत

**16.** 'आधीचे धरण भरून वाहिले. पुढील धरणांच्या साठ्यातही वाढ होत गेली.'
– याचे संयुक्तवाक्य कसे होईल ?

(1) पुढील धरणांतील साठा वाढला कारण आधीचे धरण भरून वाहिले.

(2) आधीचे धरण भरून वाहिले म्हणून पुढील धरणांच्या साठ्यातही वाढ होत गेली.

(3) आधीचे धरण भरून वाहिल्याने पुढील धरणांचा साठा वाढला.

(4) आधीचे धरण भरून वाहिले तर पुढील धरणांचा साठा वाढला.

17. 'होय, हाच तो माणूस तुला फसविणारा', या वाक्याचे प्रश्नार्थी वाक्यरूप ओळखा.

(1) तुला फसविणारा हा माणूस आहे ?

(2) काय ? हाच तो माणूस मला फसविणारा ?

(3) फसविणारा माणूस हाच आहे ?

(4) तोच हा फसविणारा माणूस आहे ?

18. 'जगात सर्व सुखी असा कोण आहे ?' या वाक्याचे विधानार्थी वाक्य कोणते ?

(1) जगात सर्व सुखी आहेत.

(2) जगात सर्व दु:खी आहेत.

(3) जगात कुणीच दु:खी नाही.

(4) जगात सर्व सुखी असा कोणी नाही.

19. श्रोत्यांनी सभागृहात शांतता राखावी. या वाक्याचा अर्थानुसार प्रकार कोणता ?

(1) होकारार्थी – आज्ञार्थ (2) नकारार्थी – आज्ञार्थ

(3) होकारार्थी – विध्यर्थ (4) नकारार्थी – विध्यर्थ

20. 'अमिता हे काम चांगले करील.' – याचे रीतीभूतकाळ वापरून कसे रूपांतर होईल ?

(1) अमिताने हे काम चांगले केले.

(2) अमिताने हे काम चांगले केले होते.

(3) अमिता हे काम चांगले करी.

(4) अमिता हे काम चांगले करत असावी.

21. अपूर्ण भविष्यकाळाचे उदाहरण ओळखा.

(1) सुधाने निबंध लिहिला असेल

(2) सुधा निबंध लिहिणार असेल

(3) सुधा निबंध लिहीत राहील

(4) सुधा निबंध लिहील

22. अनेकवचनी रूपातही न बदलणारा शब्द ओळखा.

(1) मुलगा (2) राजा

(3) राणी (4) देव

23. 'खर्चवेच' हा शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) अभ्यस्त-पूर्णाभ्यस्त (2) अंशाभ्यस्त

(3) अनुकरणवाचक (4) यापैकी एकही नाही

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**24.** 'अनादी' या शब्दाचा समास ओळखा.

(1) अव्ययीभाव समास

(2) तत्पुरुष समास

(3) द्वंद्व समास

(4) बहुव्रीही समास

**25.** 'तू नियमित व्यायाम करावास' याचे आज्ञार्थी वाक्य करा.

(1) तू नियमित व्यायाम कर.

(2) तू नियमित व्यायाम करतोस.

(3) तू नियमित व्यायाम करीत नाहीस.

(4) तू नियमित व्यायाम करीत असतोस.

**26.** 'श्रीमुखात देणे' या शब्दाचा ध्वन्यार्थ कोणता ?

(a) अभिधा

(b) लक्षण-लक्षणा

(c) व्यंजना

(d) निरूढा लक्षणा

(1) फक्त (a) व (d) बरोबर

(2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (d) बरोबर

(4) फक्त (b) व (c) बरोबर

**27.** मराठी भाषेत 'क्ष' व 'ज्ञ' ही ____________ आहेत.

(1) मृदू व्यंजने (2) जोडाक्षरे (3) महाप्राण (4) कठोर व्यंजने

**28.** व्याकरणिक दृष्ट्या बरोबर असलेला शब्द ओळखा.

(1) औपचारीक (2) तीर्थस्वरूप (3) दिपक (4) मनस्थिती

**29.** 'वयोमान' या शब्दाच्या संधीमध्ये एकत्र येणारे स्वर, विसर्ग व संधी ओळखा.

(1) व् + य् + म् + आ + न् + आ + मान

(2) व + य् + विसर्ग + म + आ = मान

(3) व + य् + विसर्ग + मान = य् + ओ + मान

(4) य् + अ + विसर्ग + मान = य् + ओ + मान

**30.** 'हालअपेष्टा सहन करण्याचा गुण' – या शब्दसमूहाबद्दल एक शब्द ओळखा.

(1) दानशूर (2) तगाई (3) तितिक्षा (4) दरवेशी

पुढील उतारा वाचून प्रश्नांची योग्य ती उत्तरे लिहा (प्रश्न सं. **31** ते **35**) :

एक भरलेलं घर. पणजोबांपासून सुना, नातवंडे, पतवंडे असा भरगच्च वाडा. एक सून मुदतपूर्वच प्रसूत झाली. मूल अपुऱ्या दिवसांचं, म्हणून नवजात बालक अतिदक्षता विभागात ठेवलेलं. नाकातून ऑक्सिजनची नळी एवढाच काय तो आशेचा धागा. पुढे दोन तीन दिवसात पणजोबा पाय घसरून पडले अन् मेंदूत रक्तस्राव झाल्यामुळे तेही अतिदक्षता विभागात. त्यांनाही ऑक्सिजनच्या रबरी नळीचा आशेचा धागा. संपूर्ण घराला दुहेरी काळजी. रबरी नळीद्वारे मिळणाऱ्या ऑक्सिजनने पणजोबांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. पण बालकाच्या बाबतीत ऑक्सिजन, स्वत:चं 'प्राणवायू' हे नाव सार्थ करू शकला नाही. बाळ गेलं! सगळं घर मृत्यूच्या स्पर्शानं थंडगार झालं. पणजोबा नीट होऊन घरी आले. त्यांचं म्हातारं मन, बालकाच्या मृत्यूने खूपच दुखा झालं. शून्यात डोळे लावून बसले पणजोबा. जिनं बालक गमावलं होतं त्या सुनेची आई आली. पणजोबांना पाहून तिच्या नजरेन असं काही दर्शविलं की, पणजोबांना आपण वाचलो याबद्दलच विलक्षण अपराधी वाटून गेलं. नंतर त्या माय-लेकींचा आकांत सुरू झाला. 'ज्याचं समदं सरलं, त्येला का नेलं न्हाई देवानं' अशा अर्थाचा तो आकांत पणजोबांच्या म्हाताऱ्या कानांपर्यंत नेमका, अचूक पोचला ! तो म्हातारा जीव आणखीच आकसून गेला. पुढे चारपाच दिवस घरात उदास वर्दळ. परंतु पणजोबांचं जेवण, औषध याकडे कुणाचं फारसं लक्ष नव्हतं, जाणीवपूर्वक नव्हे पण आपोआप तसं घडलं. आरामखुर्चीत बसलेले पणजोबा एका पहाटे घराचा निरोप घेऊन गेले कायमचेच.

येणारच होता मृत्यू, नव्हे तसा तो उंबरठ्यातच थांबलेला होता. पण पणजोबांचे अंतिम चारपाच दिवस ज्या उपेक्षेत गेले, ज्या वंचनेत गेले त्याचं काय ? नव्वद वर्षांचं एक साधं समाधानी जीवन जगलेले पणजोबा, एका भरल्या गोकुळासारख्या घरातला तो वंशपुरुष, अंतिम काळात घराला नकोशा झाल्याच्या भावनेनं व्यथित होऊन, खंतावलेल्या मनानं अन् त्यापेक्षाही अधिक अपराधी भावनेनं जगाचा निरोप घेता झाला. मृत्यू कुणाला टळलाय ? नवजात बालकाचं जाणं जिव्हारी लागणारं नक्कीच होतं. परंतु एखादं दु:ख कितीही मोठं असलं तरी ते दुसऱ्या निष्पाप जिवाला दुखवण्याचा परवाना कसा काय देऊ शकतं ?

गर्भार बाईला नऊ महिने झाले की 'दिवस भरले' असं आपण म्हणतो. एखाद्या माणसाने भयंकर अपराध केला तर 'त्याचे दिवस भरले' असंही म्हणण्याचा प्रघात आहे. पणजोबांनी असा काही भयंकर अपराध तर केला नव्हता ना ? पण त्या सुनेच्या आईच्या दु:खाने धारण केलेले ते विकारी आणि विखारी स्वरूप पणजोबांना समाधानी मृत्यूऐवजी अपराधी भावनेने आलेला मृत्यू देण्यास कारणीभूत ठरले.

*'डोळ्यामध्ये जमते पाणी कशासाठी कळत नाही*
*ऊरभरल्या उसाशाला कुठेच वाट मिळत नाही.'*

बोरकरांच्या या कवितेला गुणगुणत उरातले उसासे तसेच घेऊन पणजोबा निघून गेले.

**31.** संपूर्ण कुटुंबाला कोणत्या दुहेरी काळजीने घेरले होते ?

(1) नातवंडे, पतवंडे यांनी वाडा रिकामा झाला होता आणि पणजोबांच्या मेंदूत रक्तस्राव झाला होता

(2) अपुऱ्या दिवसाचं नवजात बालक अतिदक्षता विभागात ठेवलेलं होत आणि पणजोबांच्या मेंदूत रक्तस्राव झाला होता

(3) बालकाच्या बाबतीत ऑक्सिजन स्वत:चं 'प्राणवायू' हे नाव सार्थ करू शकला नाही आणि पणजोबांच्या मेंदूतील रक्तस्राव थांबला होता

(4) पणजोबांच्या प्रकृतीत सुधारणा झाली आणि बालकालाही जीवदान मिळाले

**32.** आजोबांना अपराधी वाटण्याचं कारण

(अ) सुनेच्या आईच्या नजरेतील नकारात्मकता

(ब) बालकाचा आकांत

(क) नाकातून घातलेली ऑक्सिजनची नळी

(ड) आपण आता कायमचे जाणार याची खंत

(1) फक्त (क) आणि (ड) बरोबर
(2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
(3) फक्त (अ) बरोबर
(4) फक्त (अ) आणि (क) बरोबर

**33.** पणजोबांच्या मृत्यूचे कारण

(अ) समाधानी जीवन

(ब) बालकाच्या मृत्यूचे दु:ख

(क) अपराधीपणा

(ड) सुनेच्या आईच्या दु:खाने धारण केलेले विकारी आणि विखारी स्वरूप

(1) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
(2) फक्त (ब) आणि (क) बरोबर
(3) फक्त (क) आणि (ड) बरोबर
(4) फक्त (अ) आणि (ड) बरोबर

**34.** 'दिवस भरणे' या वाक्प्रयोगाचा प्रस्तुत उताऱ्यात दिलेला अर्थ कोणता ?

(अ) दिवस प्रकाशाने भरणे

(ब) गर्भार बाईला नऊ महिने पूर्ण होणे

(क) दिवस भराचे काम पूर्ण होणे

(ड) एखाद्या माणसाने भयंकर अपराध करणे

(1) फक्त (ब) आणि (ड) बरोबर
(2) फक्त (अ) बरोबर
(3) फक्त (ड) बरोबर
(4) फक्त (क) बरोबर

**35.** 'ज्याचं समदं सरलं, त्येला का नेलं न्हाई देवान' असे कोणी म्हटले ?

(1) सुनेने

(2) सुनेच्या आईने

(3) कवीने

(4) पणजोबांनी स्वत:ला

**36.** 'फूलांहून' या शब्दात कोणती विभक्ती आहे ?

(1) सप्तमी
(2) पंचमी
(3) चतुर्थी
(4) तृतीया

**37.** संयुक्त वाक्य असलेले पर्याय ओळखा.

(a) वर्गात मुले आणि मुलीही आल्या.

(b) जेव्हा मोठी घंटा होते. तेव्हा शाळा सुटते.

(c) आज रविवार आहे पण शाळेला सुट्टी नाही.

(d) या समारंभाला मुख्यमंत्री येतील किंवा उपमुख्यमंत्री उपस्थित राहतील.

(1) फक्त (a) व (c) बरोबर

(2) फक्त (b) व (d) बरोबर

(3) फक्त (a), (c) व (d) बरोबर

(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

**38.** पुढे दिलेले वाक्यप्रचार व त्यांचे अर्थ यातून योग्य असणाऱ्या वाक्यप्रचाराच्या अर्थाचा अचूक पर्याय लिहा.

(1) उखळ पांढरे होणे = भीक मागण्याची पाळी येणे

(2) दाद न देणे = पुष्कळ फायदा होणे

(3) हातावर तुरी देणे = डोळ्यांदेखत फसवून निसटून जाणे

(4) उलटी अंबारी हाती येणे = पूर्णपणे दुर्लक्ष्य करणे

---

**39.** 'शहरात नोकरी करीत असतांना गोकुळला दर अकरा महिन्यांनी नवीन भाडयाच्या घरात घरसामान हलवावे लागे. त्यामुळे तो या त्रासाला अगदी कंटाळून गेला होता.' – या वाक्य समूहासाठी योग्य वाक्यप्रचाराची निवड करा.

(1) जीव लावणे

(2) जीवावर उदार होणे

(3) जीवाला घोर लागणे

(4) जीव मेटाकुटीस येणे

---

**40.** 'ठाव पाहणे' या वाक्यप्रचाराचा समर्पक उपयोग असलेले वाक्य कोणते ?

(a) शेतकरी पावसाचा ठाव पाहून पेरणी करतात.

(b) रमेशने गाव सोडल्यापासून त्याचा ठाव लागत नाही.

(c) एखाद्याच्या मनाचा ठाव पाहणे शक्य नसते.

(d) बिळातील सशाचा ठाव पाहणे कसे जमेल ?

(1) फक्त (a) व (b) बरोबर

(2) फक्त (b) व (d) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर

(4) फक्त (c) व (d) बरोबर

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

41. कोणत्या नामांचे सामान्य रूप होत नाहीत.

(a) ऊकारान्त कुलनामांचे

(b) एकारान्त नपुंसकलिंगी नामांचे

(c) ईकारान्त ग्रामनामांचे

(d) ईकारान्त कुलनामांचे

(1) (a) व (c) बरोबर
(2) (a) (b) व (c) बरोबर
(3) (a) (c) व (d) बरोबर
(4) सर्व बरोबर

42. पृथकत्त्ववाचक संख्या विशेषणाचे उदाहरण ओळखा.

(1) सहस्त्र किरणे
(2) साठावे वर्ष
(3) दुहेरी रंग
(4) दहा-दहांचा गट

43. दिलेल्या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

'भोजनशाळेत माणसे जेऊ लागली'

(1) द्विकर्मक क्रियापद
(2) साधित क्रियापद
(3) संयुक्त क्रियापद
(4) सकर्मक क्रियापद

44. पारंपरिक व्याकरणात नामांचा क्रियापदांशी असणारा संबंध किती प्रकारचा असतो ?

(1) सात
(2) पाच
(3) दहा
(4) आठ

45. न, ना. या क्रियाविशेषणांचा प्रकार ओळखा.

(a) सिद्ध क्रियाविशेषण अव्यये

(b) साधित क्रियाविशेषण अव्यये

(c) निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यये

(d) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (c) बरोबर
(4) फक्त (d) बरोबर

46. 'मितव्ययी' या शब्दाचा शब्दसमूह कोणता ?

(a) कमी व्यस्त असलेला

(b) मोजकेच खर्च करणारा

(c) मोजकेच बोलणारा

(d) मोजकेच काम करणारा

(1) फक्त (a) व (b) अचूक आहे
(2) फक्त (b) अचूक आहे
(3) फक्त (b) व (d) अचूक आहे
(4) फक्त (c) अचूक आहे

47. पुढे दिलेल्या शब्दातून पोर्तुगीज शब्द ओळखा.

(1) मंजूर
(2) मालक
(3) तंबाखू
(4) सौदागर

48. 'चंद्र' या शब्दाचे विविध अर्थ असलेले शब्द वापरून बनविलेली वाक्ये ओळखा.

(a) शशी छान दिसते.

(b) सुधाकर येथे उपस्थित आहे.

(c) तारापती गावी गेला.

(d) रजनीनाथ मंत्री झाले.

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (a) व (b) बरोबर
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

49. अ-कारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्य रूप कसे होते ?

(1) या-कारान्त
(2) आ-कारान्त
(3) वा-कारान्त
(4) ई-कारान्त

50. ईकारान्त नामे स्त्रीलिंगी असतात मात्र काही ईकारान्त नामे पुल्लिंगी असतात ती ________ यांची असतात.

(1) पक्ष्यांची
(2) प्राण्यांची
(3) व्यावसायिकांची
(4) फळांची

51. गणेशने आंबा खाल्ला. (प्रयोग ओळखा)

(1) सकर्मक कर्तरी प्रयोग
(2) कर्तरी प्रयोग
(3) कर्मणी प्रयोग
(4) भावे प्रयोग

52. 'आईने मुलीला शाळेत पाठविले' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) कर्तृ-भाव संकर प्रयोग
(2) कर्म-भाव संकर प्रयोग
(3) कर्तृ-कर्म संकर प्रयोग
(4) कर्म कर्तरी प्रयोग

53. कोणत्या विभक्तींच्या एकवचनाला प्रत्यय नाहीत ?

(1) द्वितीया व पंचमी
(2) प्रथमा व संबोधन
(3) संबोधन व तृतीया
(4) फक्त प्रथमा

54. संकेतार्थी वाक्याची उदाहरणे अचूक ओळखा.

(a) मुलांनी जर मन लावून अभ्यास केला असता, तर त्यांना परीक्षेत चांगले यश मिळाले असते.
(b) मुलांनी जर अभ्यासाकडे दुर्लक्ष केले असते, तर त्यांना परीक्षेत चांगले यश मिळाले नसते.
(c) मुलांनी जर अभ्यास केला नसता, तर त्यांना परीक्षेत चांगले यश मिळाले नसते.
(d) मुलांनी जर नीट अभ्यास केला नसता, तर त्यांना परीक्षेत कमीच गुण मिळाले असते.

(1) फक्त (a) व (d) बरोबर
(2) फक्त (b) व (c) बरोबर
(3) फक्त (b) बरोबर
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

55. जोड्या जुळवा :

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| (a) सचिन उत्तम फलंदाज आहे. | (अ) स्वार्थी |
| (b) किती छान आहे हे फुल ! | (ब) प्रश्नार्थी |
| (c) पाऊस तर पडला नाही ना ? | (क) विधानार्थी |
| (d) मुले शाळेत गेली. | (ड) उद्गारार्थी |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ड) | (क) | (अ) | (ब) |
| (2) | (क) | (ड) | (ब) | (अ) |
| (3) | (अ) | (क) | (ड) | (ब) |
| (4) | (ड) | (अ) | (ब) | (क) |

**56.** 'विदुर' या शब्दाचा अर्थ

(a) पत्नीचे निधन झालेला

(b) माहीतगार

(c) अनुभवी

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) (a) आणि (b) बरोबर (4) (b) आणि (c) बरोबर

**57.** 'सिंह' या शब्दाला समानार्थी नसलेला शब्द अचूक ओळखून त्याचा योग्य तो पर्याय लिहा.

(1) पंचानन (2) मृगराज (3) केसरी (4) शाखामृग

**58.** 'प्रश्न विचारणे हे प्रश्नार्थक सर्वनामाचे प्रमुख लक्षण आहे, पण जेथे जेथे प्रश्नार्थक सर्वनाम असेल तेथे तेथे प्रश्नार्थक वाक्य रचना असेलच असे नाही ?

(1) या विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे

(2) या विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे

(3) हे संपूर्ण विधान बरोबर आहे

(4) हे संपूर्ण विधान चूक आहे

**59.** पुढे दिलेल्या समानार्थी शब्दांच्या पर्यायातून समानार्थी नसलेल्या शब्दांचा अचूक पर्याय ओळखा.

(1) अली, मिलिंद, मधुकर, भ्रमर

(2) चंद्रिका, कौमुदी, ज्योत्स्ना, यामिनी

(3) भार्या, कांता, जाया, दारा

(4) नरेंद्र, भूपेंद्र, पृथ्वीपती, नरेश

**60.** खालीलपैकी अनुसारयुक्त चुकीचा गट ओळखा.

(1) संयम, सिंह, संहिता

(2) मुलांस, त्यांचा, देशांसाठी

(3) घरांत, संहार, मांस

(4) कामें, जाऊं, कांटा

61. Choose the correct meaning of the word 'uninhabitable'.
(1) Unsuitable for living in
(2) Suitable for living in
(3) Not habitual
(4) Habitual

62. At the very prime stage of his life he reached the zenith of power.
Identify the correct meaning of the underlined.
(1) Top position
(2) Idle state
(3) State of maturity
(4) State of extreme pressure

63. For all his predicaments his friend promised him help, and it was surely a silver lining in a dark cloud.
Identify the correct meaning of the underlined.
(1) A profitable agreement
(2) The last opportunity
(3) Plain dealing
(4) Ray of hope

64. Identify the correct sentence/s :
(a) He is a finest young player around at the moment.
(b) She was a company director when she retired.
(c) Sydney is the capital city of new South Wales.
(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Only (a) and (c)
(4) Only (b) and (c)

65. He is quite at home in English.
Identify the correct meaning of the underlined.
(1) Fluent
(2) Competent
(3) Full of comfort
(4) Happy

66. (a) Apples are sold by the dozen.
(b) He is cleverer of the two boys.
(c) Iron and coal are found in abundance in India.
Identify the sentence/s grammatically correct.
(1) Only (a)
(2) Only (b) and (c)
(3) Only (a) and (c)
(4) Only (a) and (b)

67. Identify the correct sentence.

(1) Not only she wrote the screenplay for the movie but also acted a role in it.

(2) She wrote not only the screenplay for the movie but also acted a role in it.

(3) She not only wrote the screenplay for the movie but also acted a role in it.

(4) Not only she wrote a screenplay for the movie but acted a role in it also.

68. She refused the proposal of his marriage point blank.
Identify the correct meaning of the idiom underlined.

(1) Strongly (2) Coldly

(3) Directly (4) Boldly

69. If I had been in his place, I __________ differently.
Choose the correct alternative to complete the sentence meaningfully.

(1) shall have done

(2) should have done

(3) should have been done

(4) would done

70. Complete the sentence choosing the correct alternative.
He failed to ________ at the right time and missed the train.

(1) turn up (2) turn down

(3) turn the corner (4) turn off

71. (a) Rama or Hari must lend their hands.
(b) None of my lost books were found.
(c) Each of the employees was given bonus.
Identify the correct sentence/s.

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c)

(3) Only (a) (4) Only (b) and (c)

72. Arbitrator is ____________

Complete the sentence choosing the correct alternative.

(1) a person who buys goods from the producer and sells them to customer.

(2) a person who gives you social assistance.

(3) a person who advocates a particular company's product.

(4) a person who is appointed by the parties to settle their disputes.

73. (a) The luggages are in the cloakroom.

(b) He gave me two dozen oranges.

(c) The table's leg is broken.

(d) For goodness' sake forgive me !

Identify the sentence/s grammatically correct.

(1) Only (a) and (c) (2) Only (b) and (d)

(3) Only (a), (b) and (c) (4) Only (a), (b) and (d)

74. Choose the correct option in which words are spelt correctly.

(1) reminescences, sanetorium, disastrous, compulsory

(2) reminiscences, sanatorium, disastrous, compulsory

(3) remeniscences, sanatorium, desastrous, compulsory

(4) reminiscences, sanetorium, desastrous, compulsory

75. (a) They are preparing lessons for the ensuing examinations.

(b) Ranjan is doing this important work for the last five days.

(c) The examinees stopped writing when the invigilator entered the hall.

Identify the sentence/s grammatically correct.

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)

(3) Only (b) (4) Only (a)

76. Match the pairs :

| | I | | II |
|---|---|---|---|
| (a) | One who tries to avoid reality | (i) | Gipsy |
| (b) | A person belonging to a wandering race | (ii) | Fatalist |
| (c) | One who believes in fate | (iii) | Credulous |
| (d) | One who believes very easily | (iv) | Escapist |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

77. Here is a represent ________ sample.
Select the correct suffix to make the sentence meaningful.

(1) ______ ible (2) ______ able
(3) ______ ation (4) ______ ative

78. They perform the same ________ tasks all day.
Select the correct word to complete the sentence meaningfully.

(1) repetition (2) replete
(3) repetitive (4) replacing

79. One who poses to be better than what he really is ________.
Complete the sentence choosing the correct alternative.

(1) highbrow (2) humbug
(3) smart (4) hoodoo

80. The building was <u>badly</u> damaged.
Identify the correct meaning of the word underlined.

(1) completely
(2) slightly
(3) severely
(4) partially

81. Identify the functions of the word 'after' in the following sentences.

(a) They arrived soon after.

(b) He takes after his father.

(c) After ages shall sing his glory.

(d) We went away after they had left.

(1) adjective, preposition, adverb, conjunction

(2) conjunction, adverb, adjective, preposition

(3) adverb, preposition, adjective, conjunction

(4) adverb, adjective, preposition, conjunction

82. (a) She is more charming than any other woman living.

(b) I have no ulterior motive than helping you.

(c) He has greater popularity than any other leader.

Choose the correct sentence/s.

(1) Only (a)　　(2) Only (b)

(3) Only (a) and (c)　　(4) Only (b) and (c)

83. Which of the following sentences are grammatically correct ?

(a) She did not break it nor lose it.

(b) She did not break it or lose it.

(c) A month has passed since I come here.

(d) A month passed since I am coming here.

(1) Only (b) and (c)　　(2) Only (a) and (b)

(3) Only (c) and (d)　　(4) Only (a) and (c)

84. He said, "I went to my friend's house yesterday".

Identify the sentence written in correct indirect narration.

(1) He said that he had gone to his friend's house yesterday.

(2) He said that he had gone to his friend's house the day before.

(3) He told he had went to his friend's house the day before.

(4) He informed that he went to his friend's house the previous day.

**85.** Identify the type of the clause underlined.

The problem is <u>who will bell the cat</u>.

(1) Noun clause (2) Adjective clause

(3) Adverb clause (4) Relative clause

Q. No. **86** to **90** : Read the following passage carefully and answer the items that follow. Your answers to these items should be based on the passage only :

According to Mahatma Gandhi, a man without education is like an animal. It is true that all education is not imparted through literacy because there are many who are not at all literate but are very intelligent and prudent and discriminating in the affairs of the world; but most education is imparted through literacy. Literacy means knowledge of the letters of the alphabet and the ability to read and write a language with facility. A literate or educated man can read useful literature that is available and can benefit from the experience of others. Man is not simply body but is also spirit, mind and intellect. While his physical development takes place by taking good food and taking exercises, his spiritual and intellectual development takes place through education. And thus education enables one to develop one's personality. Man's object in life is not simply to lead his life like other creatures of God's creation from cradle to the grave but also to attain higher values of life. The real happiness lies in self-realization. Self-realization means the development and expansion of all the faculties of body, mind and spirit that lie dormant in man. Man cannot develop these faculties without knowledge of the self which comes through education. Thus education is the means of self-realization. Literacy is not education, but it is certainly the gate through which education passes to the castle of human mind.

Educated, self-realized people are the asset of a nation. Multitudes of men unaware of themselves and of what is going on around them are a burden to a country. The strength of a nation is the sum-total of the strengths of the people inhabiting its territories. The illiterate, poor and backward people are a liability rather than asset to the nation. They cannot make desired contribution to the strength of the country because their own faculties and capacities undeveloped. The real strength of India has always been the mighty minds that have adorned the life and history of this country.

The real weakness of India has been its semi-starved, backward, illiterate people. If only these masses could be made literate and educated, vast amount of strength and power would be liberated that would take India on the path of development, prosperity, advancement and strength and power.

86. True education is ________

(1) The means of self-realisation

(2) The means of our bread and butter

(3) The means of gaining wealth

(4) The means of knowledge and information

87. The true happiness lies in ________

(1) Self-realization
(2) Self-understanding
(3) Self-helf
(4) Self-experience

88. With the support of ________ we can achieve self-realization.

(1) others
(2) family
(3) education
(4) religion

89. What is the strength of a nation ?
Choose the correct alternative from the passage.

(1) sum-total of strengths of people

(2) educated people

(3) military strength

(4) literate people

90. The liability of a nation is ________
Choose the correct alternative from the passage.

(1) poor, illiterate and backward people

(2) rich, literate and developed people

(3) both rich and poor people

(4) both educated and illiterate people

91. Identify the lexical relation in the underlined parts of the following sentences.

(a) I saw a lunatic.

(b) I saw a madman.

(1) Synonymy
(2) Antonymy
(3) Polysemy
(4) Hyponymy

92. Choose the correct pair of words to fill in the blanks.

(a) Columbus set out to __________ India, but discovered America.

(b) Eddison __________ the electric lamp.

(1) discover, discovered
(2) invented, invented
(3) invented, discovered
(4) discover, invented

93. Choose the correct alternative describing the following phrase.

Extempore speech

(1) A speech made without preparation
(2) An official announcement
(3) A speech made with preparation
(4) Eloquent speech

94. (a) The hut was filled with smoke.

(b) The child was tormented by thirst.

(c) She was confined to bed with fever.

Identify the sentence/s in correct passive voice.

(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Only (a) and (c)
(4) Only (b) and (c)

95. (a) I have a camera, haven't I ?
(b) Stop that noise, will you ?
(c) I had had a bath, hadn't I ?
Identify the correct sentence/s.
(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Only (a) and (c)
(4) Only (b) and (c)

96. <u>Catch</u> the opportunity when it comes.
Choose the correct word to replace the underlined.
(1) Siege (2) Cease (3) Seize (4) Seal

97. You will need to ________ the subject in greater detail.
Select the correct alternative to complete the sentence meaningfully.
(1) go down (2) go for (3) go in for (4) go into

98. Match the pairs :

| | I | | II |
|---|---|---|---|
| (a) | Loss of memory | (i) | Charisma |
| (b) | Loss of voice | (ii) | Hymn |
| (c) | A spiritual power given by God | (iii) | Amnesia |
| (d) | Song in praise of God | (iv) | Aphonia |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | i | ii |
| (2) | iv | iii | ii | i |
| (3) | ii | iii | iv | i |
| (4) | ii | i | iii | iv |

99. The old house has <u>outlast</u> the war.
Select the correct phrase for the underlined word.
(1) Stood up to (2) Stood up for (3) Stood out (4) Stood by

100. They ________ the merchant for his purse.
Select the correct word to complete the sentence meaningfully.
(1) Killed (2) Murdered
(3) Hanged (4) Slained

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK